N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** हिंगोली **P.S.(ठाणे):** हिंगोली शहर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0219 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 17/03/2025 21:27

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
   **Time Period (कालावधी):**
   **Date From (दिनांक पासून):** 12/03/2025
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 17/03/2025
   **Time From (वेळेपासून):** 16:52 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 12:26 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 17/03/2025 **Time (वेळ):** 21:14 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 038

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 17/03/2025 21:14 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 01 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** रामाकष्णा हटेल समोरील रोडवर, न्यासनोंदणी कार्यालय, हिंगोली,हिंगोली

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned by CamScanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** प्रकाश महादु राऊत

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1975

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | शाहु नगर, अंधारवाडी रोड,हिंगोली,हिंगोली शहर,हिंगोली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | शाहु नगर, अंधारवाडी रोड,हिंगोली,हिंगोली शहर,हिंगोली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9822447385

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | कुलभुषण चंद्रकांत राठे | | | 1. विठ्ठल नगर,दिनभाई विद्यालयाचे ,डिग्रस,दिग्रस,यवतमाळ, महाराष्ट्र,भारत |
| 2 | सुनिल प्रल्हादराव हाटकर | | | 1. कमलानगर, आंधारवाडी रोड, , हिंगोली,हिंगोली शहर,हिंगोली, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

तक्रार प्राप्त होताच

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**



Scanned by CamScanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

दिनांक:- 17.03.2025

फिर्याद

मी, प्रकाश महादु राऊत, वय 50 वर्ष, व्यवसाय अध्यक्ष, महात्मा ज्योतिबा फुले बहुउद्येशीय सेवा भावी संस्था,पुसेगांव,ता.सेनगांव,जि.हिंगोली,रा. शाहु नगर, अंधारवाडी रोड, हिंगोली मो.न.9822447385 समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली येथे हजर राहुन फिर्याद देतो की, मी दिनांक 12.03.2025 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो हिंगोली येथे श्री प्रफुल्ल अंकुशकर, पोलीस निरीक्षक, यांचेकडे तोंडी तक्रार दिली होती की, मी वरील ठिकाणचा राहणारा असुन वर नमुद संस्थेचा कार्यभार पाहतो.

मी महात्मा ज्योतिबा फुले बहुउद्येशीय सेवा भावी संस्था, पुसेगांव,ता.सेनगांव,जि.हिंगोली चा अध्यक्ष असुन सदरची संस्था हि दि.08.03.2008 रोजी रजिस्टेशन झालेली असुन तेव्हापासुन सदरची संस्था सुरू होती. मध्यंतरी काळामध्ये दि.08.03.2022 रोजी काही कारणास्तव धर्मदाय आयुक्त कार्यालय, हिंगोली यांनी माझे संस्थेचे रजिस्टेशन रद्द केले होते. म्हणुन मी धर्मदाय सह आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, औरंगाबाद यांचेकडे अपील केले होते.तेथे त्यांनी माझे बाजुने निकाल दिल्याचे नंतर मी त्या निकालाची एक प्रत सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, हिंगोली येथे आणुन सादर केली आहे.

त्यानंतर सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, हिंगोली येथे माझे संस्थेचे रजिस्ट्रेशन बाबत परत सुनावणी होवुन त्यांनी सुध्दा अंदाजे आठ ते नऊ महिने अगोदर माझे बाजुने निकाल दिला आहे परंतु सदर निकालाची प्रत मला अद्याप पावेतो दिलेली नाही. त्यामुळे माझी संस्था सध्या बंद आहे.

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, हिंगोली यांचेकडे माझे संस्थेचे बाजुने दिलेल्या निकालाची प्रत मिळणेकरीता मी तेथे रितसर अर्ज केलेला आहे. आज रोजी माझे ओळखीचा खाजगी व्यक्ती नामे सुनिल हटकर यांनी त्याचे फोन क्रमांक 9325530049 वरून माझे फोन क्रमांक 9822447385 वर फोन करून कळविले कि, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, हिंगोली येथील रोठे साहेबांनी तुमचं काम करून देण्यासाठी 10,000/- रु लागतात असा निरोप त्यांनी मला दिला आहे असे कळविल्याने, मी आज रोजी सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, हिंगोली येथील लोकसेवक श्री रोठे यांना प्रत्यक्ष जावुन भेटलो व माझे कामासंबधी बोलणी करून माझे संस्थेच्या बाजुने दिलेल्या निकालाची प्रत देण्यास विनंती केली असता त्यांनी मला त्यांचे ओळखीने काम करून देण्याचे आश्वासन देवुन सदरचे कामाकरीता 10,000/- रु लागतात असे म्हणुन लाचेची मागणी केलेली आहे.

मला माझी संस्था सुरू ठेवण्यासाठी संस्थेचे रजिस्ट्रेशन बाबत लागलेल्या निकालाची प्रमाणीत प्रतची आवष्यकता असल्यामुळे मी नाईलाजास्तव त्यांना 10,000/- रु देण्यासाठी तयार झालो आहे, सदर रक्कम ही लाच असल्याचे मला माहित झाल्याने, सदरची लाच रक्कम देण्याची माझी इच्छा नाही. माझे सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, हिंगोली येथील लोकसेवक श्री रोठे यांचेशी कोणतेही वैमनस्य नाही किंवा त्यांचेशी कोणतेही देण्या-घेण्याचा अथीक व्यवहार नाही. तसेच ते कोणत्या पदावर आहेत हे सुध्दा मला माहित नाही .लोकसेवक श्री रोठे यांना लाच देण्यासाठी 10,000/- रु मी माझे घर खर्चाचे बचतीमधुन तसेच उसने घेवुन सोबत आणलेले आहेत. तरी लोकसेवक श्री रोठे, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, हिंगोली यांनी स्वतः अथवा त्यांच्या वतीने इतर कोणीही लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई करावी. अशी तोंडी तक्रार दिली होती.

त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीच्या संबंधाने दिनांक 12.03.2025 रोजी तक्रार पडताळणी कार्यवाही करण्याकरीता पंच क्र.01 रवि जोंधळे यांचेसह लोकसेवक रोठे सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, हिंगोली यांची भेट घेण्याकरीता



Scanned by CamScanner

त्या कार्यालयात गेलो. तेव्हा माझे संस्थेच्या कामासंबधी बोलणी करून माझे बाजुने लागलेल्या निकालाची प्रमाणीत प्रतची मागणी केली त्यानंतर मी त्याना म्हणालो कि, एजंट हाटकर भेटला होता त्याने मला 10,000/- रु लागतात असा निरोप दिला आहे. ते थोडं जरा जास्त मनु लागलं ........कमी जास्त करू" त्यावर लोकसेवक लोथे म्हणाले " त्यायले तेवढच सांगण्यात आलं...... जे तुम्हाला बोलले" तेव्हा तक्रारदार राऊत म्हणाले नाही ते मलं जास्त पैसे मागु लागले.... नं लोथे सर... ते मलं दहा मनलं...तेव्हा लोकसेवक लोथे म्हणाले मग तेच बरोबरं आहे...त्यावर मी म्हणालो की, थोडं करानं कमी जास्त जादु दयानं..... थोडं कमी करा असं म्हणतलो. त्यावर लोकसेवक लोथे म्हणाले की, झालं असतं तं .... केलच असतं पंधरा म्हणले होतेत ते... झालं असते त....त्यावर मी म्हणालो की, पंधरा हजार रूपये.....तेव्हा लोकसेवक लोथे म्हणाले की, हं.... मीच त्याहीले म्हटलं.... देइन असं कर.....तेव्हा मी म्हणालो की, थोडं गरीबांच चार पाचशे रूपये गरिबांच वाटोळ व्हायचं..... दहा हजार म्हणल्यावर ....काहीतरी.... त्यावर लोकसेवक लोथे म्हणाले की, आता काय...... पाचशे हजार कमी द्या तुम्ही.... दुसरं काय.... ठिक हे.... काय घोर नाही... काय घोर नाही... असे म्हणून लाचमागणी करून लाच रक्कम स्विकारण्यास सहमती दर्शविली होती.

त्यावरून आज दिनांक 17.03.2025 रोजी पो.नि.श्री.प्रफुल्ल अंकुशकर, ला.प्र.वि हिंगोली यांनी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय हिंगोली येथे सापळापुर्व कार्यवाही दोन पंचासमक्ष करून दाखविली त्यानंतर मी लाच म्हणून देण्यासाठी आणलेले 9,000/- रु. (ज्यात 500/- रु. चे 18 नोटा) चे नंबर व वर्णन एका कागदावर टंकलिखीत करण्यात आले होते. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. प्रफुल्ल अंकुशकर, यांनी अँन्थ्रॉसीन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्प बाबत माहिती दिली. त्यांचे प्रात्यक्षिक सपोउपनि शेख महमद शेख युनूस लाप्रवि हिंगोली यांचे करवी करून दाखविले व लाच म्हणून दयावयाच्या नोटांना दोन्ही बाजुने अँन्थ्रॉसीन पावडर लावली. लोकसेवक लोथे यांनी लाच स्विकारल्या नंतर माझे गळयातील पांढरा मोठा रुमाल उजवे हाताने काढून झटकुन हातात धरावा. असा ईशारा करावयाचा असल्याचे पोलीस निरीक्षक श्री.प्रफुल्ल अंकुशकर यांनी मला व पंचाना तसेच सापळा पथकातील सर्व सदस्यांना सुचना दिल्यात.

त्यानंतर 12.26 वा. दरम्यान मी व पंच क्र.01 रवि जोंधळे माझे मोटार सायकलने लोकसेवक लोथे यांची भेट घेण्यासाठी सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय हिंगोलीकडे रवाना झालो. आमचे पाठोपाठ सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी व पंच क्र.02 असे सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय हिंगोलीकडे आले. तेव्हा माझी व खाजगी इसम सुनिल हाटकर यांची भेट झाली तेव्हा मी त्यांना म्हणालो कि, मला लोथे साहेबाला भेटायचं आहे. तेव्हा सुनिल हाटकर मला म्हणाला कि, '' ते त्या दिवशीच म्हणले, तुम्हाला त्याहिचं काम करायचं आसनं तर बाहेरचं मुमच्याकडं, नाही बोलायचं नाही म्हणले मला तुमचं काम करायचं असन तुमच्या जवळ घेवुन टाका आणि मग संध्याकाळी नक्कल घेवुन जा असे रोठे साहेबांनी मला क्लियर सांगीतलं '' असे खाजगी इसम हाटकर बोलले. तेव्हा मी सुनिल हाटकर यास म्हणालो कि, मला साहेबाला भेटु दे अशी विनंती केली त्यानंतर मी लोकसेवक लोथे यांची भेट घेतली व त्यांनी सांगीतल्या प्रमाणे रक्कम सोबत घेवुन आलो आहे असे बोललो असता लोकसेवक लोथे यांनी खाजगी इसम सुनिल हाटकर यांचेकडे देण्याचे सांगीतले. म्हणुन मी आनलेली लाचेची रक्कम घेवुन सुनिल हाटकर यांना देण्यासाठी निघालो तोपर्यंत तो त्याचे मोटर सायकलवर बसुन बाहेर कुठेतरी निघुन गेला होता. नंतर मी माझे फोन क्रमांक 9822447385 वरून त्याचे फोन क्रमांक 9325530049 वर फोन करून त्याचा ठावठिकाणा घेतला असता सुनिल हाटकर मला म्हणाला कि, मी पाच मिनीटांत आलो असे म्हणाला म्हणुन मी त्याची रामाकृष्णा हॉटेलचे समोर रोडवर उभा राहुन त्याची वाट बघितली, तेव्हा थोडयावेळाने सुनिल हाटकर हा तेथे आला व मला रामाकृष्णा हॉटेलचे समोर रोडवर भेटला तेव्हा मी आणलेली लाचेची रक्कम 9,000/- रु सुनिल हाटकर यांचेकडे प्रत्यक्ष देतांना मोजुन घ्या म्हणालो तेव्हा सुनिल हाटकर मला म्हणाला कि, '' हो मोजुनच घेतो '' असे म्हणुन त्याने ती रक्कम घेवुन दोन्ही हाताने मोजुन घेतली व त्याचे दोन्ही हातात धरली. त्यानंतर मी तावडतोब सापळा पथकास ठरल्या प्रमाणे लाच स्विकाल्याचा ईशारा केला. तेव्हा सापळा पथकाने आमच्या जवळ येवुन खाजगी इसम सुनिल हाटकर यांस 13.38 वा. रामाकृशणा हॉटेलचे समोर रोडवर ताब्यात घेतले व त्यांचे हातात ठेवलेली लाचेची रक्कम 9,000/-रु. त्याचेकडून पंचासमक्ष जप्त केली.

त्यानंतर परत मी व सापळा पथकातील अधिकारी आणि अंमलदार असे तावडतोब सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयात गेलो व तेथे हजर असलेले लोकसेवक लोथे यांना देखील ताब्यात घेतले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री प्रफुल्ल अंकुशकर यांनी त्यांना त्यांचे सुपर्ण नांव विचारले असता त्यांनी त्यांचे नांव कुलभुषण चंद्रकांत रोठे,पद- शिपाई, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, हिंगोली असे असल्याचे सांगीतले. तेव्हा मला लाचेची मागणी करणारे लोकसेवकाचे नांव लोथे नसुन रोठे असल्याचे तसेच तो शिपाई असल्याचे समजले.

तरी सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयातील लोकसेवक रोठे यांनी माझी महात्मा ज्योतिबा फुले बहुउद्येशिय



Scanned by CamScanner

सेवाभावी संस्था, पुसेगांव, ता.सेनगांव, जि.हिंगोली च्या बाजुने दिलेल्या निकालाची प्रमाणीत प्रत मला देण्याकरीता खाजगी ईसम सुनिल प्रल्हादराव हाटकर, रा. कमलानगर, आधारवाडी रोड, ता.जि. हिंगोली यांचे मार्फत 10,000 /-रू. लाचेची मागणी केल्याचा निरोप मिळाल्याने मी दि. 12.03.2025 रोजी लोकसेवक रोठे यांची प्रत्यक्ष भेट घेवून काही कमी करण्यास विनंती केली असता त्यांनी पाचशे- हजार कमी द्या अशी लाच मागणी करून लाच रक्कम स्विकारण्यास संमती दिली.

त्यावरून दि.17.03.2025 रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक कुलभुषण चंद्रकांत रोठे,शिपाई, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, हिंगोली, रा.विठ्ठल नगर,दिनभाई विद्यालयाचे पाठीमागे, संजय कोंडावार यांचे घरी, दिग्रस, ता. दिग्रस, जि.यवतमाळ यांचे सांगणेवरून खाजगी ईसम सुनिल प्रल्हादराव हाटकर, रा. कमलानगर, अंधारवाडी रोड, ता.जि. हिंगोली यांनी माझे कडून 9,000/-रू. लाच रक्कम स्वतः स्विकारली म्हणुन त्या दोघांचे विरूध्द योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी म्हणून मी फिर्याद देत आहे.

माझी वरील फिर्याद सापळा कार्यवाही झाल्यानंतर ला.प्र.वि. कार्यालय हिंगोली येथे आज दिनांक 17.03.2025 रोजी पोलीस निरीक्षक श्री प्रफुल्ल अंकुषकर यांना तोंडी सांगितली ती त्यांनी संगणकावर टंकलिखित केली. माझे वरील फिर्यादीची प्रींट काढल्यावर मी वाचून पाहिली ती बरोबर व खरी आहे.

समक्ष

सही -

( प्रफुल्ल अंकुषकर)

महादु राऊत प्रकाश

पोलीस निरीक्षक

रोड, हिंगोली ता.जि. हिंगोली शाहु नगर, अंधारवाडी

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग हिंगोली .

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): PRAFULL HANUMANTRAO ANKUSHKAR

**Rank** (पद): I (Inspector) **No.**(क्र.): PI

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

Scanned by CamScanner

or (अथ: कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) Transferred to P.S.
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14 Signature/Thumb impression of the complainant / informant.
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15 Date and time of dispatch to the court
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): narendra bhimrao p
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): 50686



Scanned by CamScanner